

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
शरदचंद्र पवार



जनता आहे सोबत
**या लढाईत**
होणार प्रत्येकाचा
**विश्वास सार्थ**

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
शरदचंद्र पवार

# श्री.नवनाथ रोहिदास पारगे

खडकवासला विधानसभा मतदार संघाच्या जनतेचा
एकमेव विश्वास प्रगतीसह होणार विकास !

खडकवासला विधानसभा मतदार संघासाठी

तुमची साथ..तुमचा नवनाथ..

प्रत्येक राजकीय पैलवानांचे वस्ताद..



आदरणीय

# साहेब

२११, खडकवासला विधानसभा मतदार संघ

नातं विश्वासाचं.. उद्दिष्ट विकासाचं..

# माझा परिचय



श्री.नवनाथ रोहिदास पारगे,
शिक्षण : B.A.
माजी जिल्हा परिषद सदस्य पुणे,
एकनिष्ठ कार्यकर्ता साहेबांसोबत

कौटुंबिक पार्श्वभूमी
वडील रोहिदास पारगे
डोणजे ग्रामपंचायतचे अनेक वर्ष सरपंच,

30 वर्षाहून अधिक काळापासून ग्रामपंचायतीवर एकहाती सत्ता.

पत्नी : पूजा नवनाथ पारगे,(जिल्हा परिषद सदस्य सन २०१७)
महिला व बालकल्याण सभापती पुणे जिल्हा परिषद.
खडकवासला महिला आघाडी अध्यक्ष

नमस्कार मी नवनाथ रोहिदास पारगे, ग्रामपंचायतच्या माध्यमातून आपल्या सामाजिक जीवनाला मी 2010 रोजी सुरुवात केली, घरात राजकीय वारसा असताना लहानपणापासूनच समाजकारण आणि राजकारणाची आवड वडिलांकडे पाहून निर्माण झाली.

माझे वडील स्वर्गीय रोहिदास पारखे हे पवार साहेबांचे खंदे समर्थक, ज्यावेळी पक्षाची स्थापना झाली त्यावेळी पासून पक्षाचे ते एकनिष्ठ कार्यकर्ते पक्ष वाढवण्यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले, पक्ष वाढीसाठी विविध उपक्रम त्या काळात त्यांनी घेतले होते,

सामाजिक चळवळीतून ग्रामपंचायतच्या माध्यमातून मी राजकारणात उतरलो गेलो व गावच्या उपसरपंच पदाची जबाबदारी माझ्यासारख्या कार्यकर्त्यावर पडली, गावकऱ्यांचा विश्वास व विकासाची नाळ जोडत मी विकास कामासाठी नेहमी कटिबद्ध राहिलो व 2012 साली मला त्याचे फळ मिळाले,

पक्षाच्या नेतृत्वाने मला जिल्हा परिषदेची उमेदवारी जाहीर केली व अल्प दिवस असताना देखील दिग्गज विरोधकांसमोर मी प्रचंड बहुमताने निवडून आलो,

मोठ्या सभागृहात गेल्यानंतर ग्रामपंचायतीत केलेले काम हे निश्चितपणे मला कामी आले आणि त्या माध्यमातून गाव स्तर ते जिल्हा परिषद मधील अडीअडचणी साठी मतदारसंघात कॅम्प घेऊन मी नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी नेहमी कटिबद्ध राहिलो,

माझ्या मतदारसंघांमध्ये पुणे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयाचा विकास निधी खेचून आणण्यात मला मोठ्या प्रमाणात यश आले, त्यानंतर आमच्या भागाच्या खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या माध्यमातून देखील अनेक विकासकामे मार्गी लावण्यात आम्हाला यश आले.

त्याचेच फळ म्हणून 2017 साली माझ्या जिल्हा परिषद गटात महिला आरक्षण पडले, व त्यानंतर माझ्या पत्नीला पूजा पारगे या मतदारसंघातून भरघोस मतांनी विजयी झाल्या,

पक्षाने देखील विश्वास ठेवत महिला व बालकल्याण सभापती पदाची जबाबदारी दिली ती देखील पूर्ण करत विविध विकास कामे त्या माध्यमातून जिल्हाभरात व खडकवासला विधानसभा मतदारसंघात करण्यात आम्हाला यश आले याचा नेहमीच एक वेगळा आनंद भेटतो.

आजपर्यंत पक्षाने ज्या ज्या जबाबदाऱ्या दिल्या त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न आम्ही निश्चितपणे केला आहे,

विविध उपक्रमाच्या माध्यमातून जनतेसोबतची नाळ कधीही तुटू दिली नाही,

देशाचे नेते आदरणीय शरदचंद्रजी पवारसाहेब यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने मा. खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या संकल्पनेतून आपल्या खडकवासाला विधानसभा ग्रामीण भागांत सामाजिक न्याय विभाग व अधिकारी मंत्रालय दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व जिल्हा परिषद पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने कृत्रीम अवयव व सहाय्यभूत साधने तसेच वयोश्री योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या सहाय्यता वस्तू मोफत वाटप करण्यात आले.









मातीच्या खेळांना प्राधान्य हेच मातीतल्या माणसाचे पहिले कर्तव्य आणि हेच कर्तव्य चोखपणे बजावुन  कल्याण गावांत भव्य कुस्ती आखाड्याची निर्मिती केली.

बारामती लोकसभा मतदार संघाच्या विद्यमान खासदार मा. सौ. सुप्रियाताई सुळे यांच्या प्रयत्नांतून आहिरे गावांत विविध विकास कामांचा शुभारंभ करण्यात आला.












बहुली-भगतवाडी येथे मार्च २०२१ मध्ये अचानक लागलेल्या आगीतून २२ घरे पूर्णपणे जळून खाक झाली होती. आपल्या भागात घडलेल्या या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर पीडितांना आधार देण्यासाठी जि. प. सदस्य पुजाताई पारगे पुढे सरसावल्या.सिने अभिनेते नाना पाटेकर यांच्या पुढाकाराने नाम फाउंडेशनच्या माध्यमातून या कुटुंबियांसाठी तात्काळ घरे उभारण्यात आली. तर  खासदार सौ. सुप्रियाताई सुळे यांच्या मार्गदर्शनातून जि. प. महिला व बालकल्याण समिती सभापती पुजाताई पारगे यांच्या सभापती फंडातून प्रत्येक कुटुंबासाठी ५० हजार असे एकूण ११ लाख रुपये या कुटुंबांना मंजूर करण्यात आले.

आर्वी गावामध्ये बारामती लोकसभा मतदार संघाच्या विद्यमान खासदार मा. सौ. सुप्रियाताई सुळे यांच्या खा. निधीतून व पुणे जिल्हा परिषद सदस्य पुजाताई पारगे यांच्या निधीतून मंजूर झालेल्या सभामंडप बांधणे, रस्ता कॉक्रेटीकरण, स्मशानभुमी आ.सी.सी.शेड व सुधारणा करणे,  प्राथमिक शाळा दुरूस्ती इ कामे करण्यात आली









सन्माननीय खासदार मा. सौ. सुप्रियाताई सुळे यांच्या खासदार व महिला बालकल्याण समिती सभापती तथा मा. जि. प. सदस्या सौ. पूजाताई नवनाथ पारगे यांच्या प्रयत्नांतून रहाटवडे गावात १ कोटी ३८ लाखांच्या निधीतून नळ पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन करून जल जीवन मिशनच्या माध्यमातून काम पूर्णत्वास नेले.







# सदैव,सर्वत्र,कार्यरत..


प्रशासक, राज्यसरकार व वनविभागाच्या मनमानी कारभाराच्या विरोधात संताप व्यक्त करत किल्ले सिंहगडावरील हॉटेल व्यवसायिकांनी 'भीक मागो आंदोलन केले'.गेली ५० वर्षांहून अधिक काळ किल्ल्यावर व्यवसाय करणाऱ्या स्थानिकांची हॉटेल ३ दिवसांपूर्वी जमीनदोस्त करण्यात आली. यामुळे किल्ल्यावर उदरनिर्वाह अवलंबून असलेल्या स्थानिक नागरिकांवर अक्षरशः उपासमारीची वेळ आली. या गोष्टीचा निषेध म्हणून किल्ल्यावर येणाऱ्या पर्यटकांसमोर थाळ पसरवून हे भीक मागो आंदोलन करून प्रशासन व सरकारच्या या बेजवाबदार कृत्याच्या विरोधात नागरिकांनी आपला निषेध नोंदवला.











महिला बालकल्याण सभापती पूजाताई नवनाथ पारगे यांच्या जिल्हा परिषद निधीतून बंदिस्त गटार व्यवस्थेसाठी ३ लाख रुपये व रस्ता कॉंक्रीटीकरणासाठी १० लाख रुपयांच्या पुर्ततेतून  श्रीरामनगर येथील श्रीराम मंदिर, परिसरात अमूल आईस्क्रीम शॉप ते पवार आळी पर्यंतचा रस्ता कॉंक्रीटीकरण करण्यात आला.सदर कामाचा दर्जा व गुणवत्ता याबाबत श्रीरामनगर येथे प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.

## सदैव,सर्वत्र,कार्यरत..



बारामती लोकसभा मतदारसंघाचे विद्यमान खासदार माननीय सौ सुप्रियाताई सुळे यांच्या मार्गदर्शनातून तसेच महिला व बालकल्याण विभाग सभापती तथा विद्यमान जिल्हा परिषद सदस्य माननीय सौ पूजाताई नवनाथ पारगे यांच्या माध्यमातून महिला व बालकल्याण विभागाच्यावतीने गरजू महिलांना मंजूर करण्यात आलेल्या शिलाई मशीन व पीठ गिरणी, सोलर वॉटर हिटर, तेलघाण्याचे डोणजे गावातील लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले.

# पक्ष वाढीसाठी सदैव कार्यरत..

महा संसदरत्न आदरणीय खासदार सौ.सुप्रियाताई सुळे यांच्या प्रचारार्थ गावागावात जाऊन सर्वांच्या भेटी घेऊन आदरणीय ताईंनी केलेल्या कामाची माहिती दिली, याचाच फायदा होत ग्रामीण भागातील मोठ्या प्रमाणात मताधिक्य घेत ताई चौथ्यांदा खासदार पदी विराजमान झाल्या, व याचा फायदा नक्कीच आपला पक्ष,परिवार वाढीसाठी झाला याचा मला एक कार्यकर्ता म्हणून अभिमान आहे.

















# संकटकाळी सदैव तत्पर...

## आमची माई, सुप्रियाताई

पुण्यातील एकता नगर, चरवड नगर राधाकृष्ण विहार परिसर, निंबज नगर, वारजे, उत्तमनगर, कोंढवे- धावडे , उत्तमनगर शिवणे परिसरात झालेल्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी बधितांशी बारामती लोकसभा मतदारसंघाच्या खा. सुप्रियाताई सुळे यांच्या समवेत संवाद साधून त्यांच्या समस्या आणि झालेल्या नुकसानीची माहिती घेतली.



देशाचे नेते आदरणीय
शरदचंद्रजी पवार साहेब
यांच्या वाढदिवसानिमित्त
विविध उपक्रमाचे
आयोजन

देशाचे नेते आदरणीय
शरदचंद्रजी पवार साहेब
यांच्या वाढदिवसानिमित्त
विविध उपक्रमाचे
आयोजन






आषाढी एकादशी निमित्त
श्री क्षेत्र विठ्ठलवाडी
येथे खिचडी,फळे वाटप
व मोफत रिक्षा
सेवेचे आयोजन केले.

## होय, हे आम्ही करून दाखवलं..

- श्री क्षेत्र कोंढणपूर येथे श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या १६ फुटी अश्वारूढ पुतळ्याकरिता जिल्हा परिषदेच्या माध्यमातून १ कोटी ६० लाख निधी उपलब्ध करून पुतळा उभारण्यात आला.
- प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्र नवीन इमारती साठी ०३ कोटी निधी उपलब्ध केला.
- सर्व गावातील जिल्हा परिषद शाळेच्या नवीन इमारती,संरक्षक भिंती व शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यांची निर्मिती केली.
- संसदरत्न खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या माध्यमातून सिंहगड किल्ला विकास आराखडा, ऐतिहासिक वस्तूंचे जतन करण्यासाठी विशेष निधी उपलब्ध केला.
- गडावरील स्थानिकांना रोजगार उपलब्ध करण्यासाठी वनविभागाकडून खाद्यपदार्थांच्या स्टॉल करीता जागा उपलब्ध करून दिली.
- जिल्हा परिषदेच्या माध्यमातून १० हजार नागरीकांना शिलाई मशिन, फॉल पिको मशिन, पिठगिरण, सायकल, पाण्याची मोटर, कडबा कुट्टी मशिन, कॅरेट, गुरांच्या मॅट, ताडपत्री, पीव्हीसी पाईप, सौरदिपथ पाण्यावरील इंजिन, शेतकरी अवजारे व्यवसायिक टपऱ्या इत्यादी वैयक्तिक लाभार्थी योजनांचा नागरीकांपर्यंत पोहचवल्या.
- राष्ट्रीय पेय जल योजना (जल जीवन मिशन) अंतर्गत ९० कोटींचा निधी उपलब्ध करून विविध गावात योजना यशस्वीपणे राबविली. (इतिहासात पाणी न पोहोचलेल्या गावापर्यंत पाणी पोचविण्यात यशस्वी )
- आदरणीय शरदचंद्र पवार साहेबांच्या वाढदिवसानिमित्त बैलगाडा शर्यत आरोग्य शिबीर,रक्तदान शिबीर अशा विविध उपक्रमांचे आयोजन केले
- कल्याण गावामध्ये कुस्ती आखाड्यांची निर्मिती केली.
- कोरोना काळात नागरिकांना अन्नधान्य किट, सॅनिटायझर वाटप तसेच कोरोना प्रतिबंधक लसीकरणाचे आयोजन केले

# निर्धार खडकवासला विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगिण विकासाचा

- मतदारसंघात मुलांसाठी खेळाचे मैदान उपलब्ध करून देणे.
- वाढती लोकसंख्या लक्षात घेता सुसज्ज रस्त्यांची निर्मिती करून नागरिकांना सर्व सोयीसुविधा देण्यावर भर देणे.
- मतदारसंघात असणाऱ्या पर्यटन स्थळांमुळे होणारी वाहतुक कोंडी लक्षात घेता त्यावर योग्य नियोजन करणे.
- मतदारसंघात शासकीय सुसज्ज हॉस्पिटलची निर्मिती करणे.
- कलाक्षेत्राला वाव मिळावा याकरिता नाट्यगृहाची निर्मिती करणे.
- मतदारसंघातील नागरिकांसाठी २४ तास पाणीपुरवठा योजना राबविणार.
- धायरी लोकमत प्रेस ते सावित्री गार्डन D.P रस्ता आराखडा मंजूर करणे.
- पुणे म.न.पा.तील नव्याने समाविष्ट झालेल्या गावांना D.P आराखडा मंजूर करणे.
- कोंढवे, धावडे, उत्तमनगर, शिवणे रस्ता रुंदीकरण करणे व तेथील नियोजीत भाजी मंडईसाठी योग्य सोय करणे.
- सिंहगड रोड, धनकवडी, बालाजीनगर, बावधन, भुसारी कॉलनी विकासासाठी संतुलित विकास आराखडा तयार करणे.
- खडकवासला विधानसभा मतदार संघात सी. सी.टीव्ही बसविणे.
- अनधिकृत फ्लॅटधारकांच्या बाबतीत संपूर्ण शास्त्रीकर माफ करून अनधिकृत घरे अधिकृत करणार.
- धायरी, शिवणे, वारजे, नांदेडगाव, नऱ्हे समाविष्ट गावातील शेती ना विकास झोन बदलून, आर झोन करणार.
- ट्रॅफिक फ्री मतदारसंघ करण्यावर विशेष भर देणार.
- पाऊस काळात खडकवासला धरणातून मोठ्या प्रमाणात सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या विसर्गामुळे नदीलगत असणाऱ्या सोसायट्या,रहिवासी भागांना होणारा त्रास पूर्णपणे कमी करण्यासाठी प्रयत्नशील राहणार.


यंदा मिळावी
निष्ठावंताला संधी,
तीच ठरेल खडकवसल्याच्या
विजयाची नांदी...

# उमेदवार पराभूत होण्याची कारणे..

- गेल्या दीड वर्षांपूर्वी अचानक पक्षाने सांगितले की तुम्हाला बाजार समितीची निवडणूक लढायची आहे कुठलीही तयारी नसताना पक्षाचा आदेश मानून लढायला तयार झालो, मात्र त्यानंतर प्रचार करत असताना असे समजले की येथे कोणीच लढायला तयार नव्हते त्यामुळे तुम्हाला उभा केले आहे मात्र खचून न जाता पवार साहेबांनी केलेला संघर्ष डोळ्यासमोर ठेवून जोमाने निवडणूक लढलो मात्र अल्पशामताने माझा पराभव झाला, यात निश्चितपणे पक्षाच्या जिल्ह्यातील वरिष्ठ नेत्यांनीच घात केला, मात्र मी कधीही कोणावर टीका न करता माझा पराभव मान्य करत पुन्हा जोमाने काम करत राहिलो.

- खडकवासला विधानसभा मतदारसंघात आजपर्यंत पक्षाला यश मिळाले नाही हे माझ्या सारख्या कार्यकर्त्याला निश्चितपणे मनात खेद व दुःख आहे, गल्ली ते दिल्ली सत्ता असताना देखील खडकवासल्याचा आमदार श्रद्धेय शरद पवार साहेबांच्या विचाराचा होऊ शकला नाही, हे मात्र नेहमीच माझ्यासारख्या तरुण कार्यकर्त्याला खटकत राहिले,

- मात्र त्याचा पूर्णपणे अभ्यास केल्यावर असे लक्षात आले की शहरात नेहमीच डावपेचाचे राजकारण होते व आपल्या उमेदवाराचा पराभव होतो,

- आजपर्यंत पक्षाने दिलीप बराटे, विकास दांगट, सचिन दोडके या नगरसेवकांना संधी दिली, मात्र हे लोक एकमेकांच्या विरोधात परस्पर विरोधी काम करतात, त्यामुळे अल्पशामताने विरोधी पक्षाचा उमेदवार निवडून येतो.

- या तिन्ही देखील उमेदवारांना माझ्या खडकवासला ग्रामीण मतदारसंघातून मी नेहमीच लीड देत आलो त्यामुळे हे सर्व उमेदवार मला सर्वच निवडणुकात मदत करतात हे सांगण्यासाठी मी कुठलाही संकोच करत नाही, मी मात्र पक्षाचा आदेश पाळणारा कार्यकर्ता आहे आणि त्या हेतूने मी गेल्या पंधरा वर्षातल्या प्रत्येक विधानसभेत माझ्या मतदारसंघातून लीड देण्याचे काम केले आहे.

## उमेदवारी मला का मिळावी याची ठराविक मुद्दे..

- यावेळी खडकवासला विधानसभा ग्रामीण मतदारसंघात जवळपास 60 ते 65 हजाराच्या आसपास मतदान नोंद झालेले आहे, वाढत्या लोकसंख्येमुळे ग्रामीण भागातील लोकांना देखील आपल्या पट्ट्याचा आमदार झाला पाहिजे अशी आशा आहे.
- पक्षाने जर माझ्यासारख्या कार्यकर्त्यावर विश्वास ठेवला तर निश्चितपणे मी पक्षाची खडकवासल्याची जागा खेचून आणण्यात मला यश येईल,
- ग्रामीण भागातून 70 टक्के मतदान ग्रामीण पट्ट्यातल्या उमेदवाराला मिळू शकते; आज ग्रामीण पट्ट्यातील प्रत्येक पक्षाचा कार्यकर्ता हा विचाराचा झाला आहे की ग्रामीण पट्ट्यात उमेदवारी मिळाली पाहिजे त्यामुळे पक्षाने जर विश्वास दाखवला तर भारतीय जनता पार्टी, एकनाथ शिंदे शिवसेना व अजित पवारांची राष्ट्रवादी हे सर्व मिळून ग्रामीण मधून जास्तीत जास्त सहकार्य करतील.
- शहरात देखील या मतदारसंघाचा बराच भाग येतो तशी आम्ही त्याची गोळा बेरीज केलेली आहे, मात्र मी शहराच्या राजकारणात कधीही लक्ष न दिल्यामुळे पक्षाचे सर्व कार्यकर्ते एकनिष्ठेने काम करतील त्यामुळे विजयाकडे जाण्यासाठी मोठी मदत होईल.
- शहरातील उमेदवार एकमेकांच्या विरोधात काम करतात त्यामुळे त्यांच्या एकमेकांच्या विरोधात नाराजी आहे मात्र सातत्याने मी पक्षाच्या आदेशानुसार लीड देण्याचे काम केले आहे त्याच्यामुळे ते परतफेड करतील.
- आजपर्यंतच्या सामाजिक चळवळीत काम करत असताना एक रुपयाचा देखील भ्रष्टाचार केला नाही स्वच्छ इमेज म्हणून चेहरा मतदारसंघात आहे.

## उमेदवारी मला का मिळावी याची ठराविक मुद्दे..

- नात्यागोत्याच्या राजकारणाचा मोठा फायदा यावेळी होईल.
- आमच्या नातेवाईकांची संख्या खूप मोठी आहे, वांजळे,बराटे, पोकळे, पायगुडे, लायगुडे, इंगळे, मते,बांदल, खडकवासला विधानसभा मतदारसंघात संपूर्ण नातेगोत्याचा फायदा आपला उमेदवार म्हणून निश्चितपणे होऊ शकतो लोकसभेला देखील आम्ही त्याचा फायदा यावेळी सुप्रियाताई सुळे यांना करून घेतला आहे प्रत्यक्षरीत्या त्या स्वतः देखील आमच्यासोबत होत्या त्यामुळे त्यांना ह्या सर्व गोष्टी माहित आहेत.
- तरुण वर्गाची मोठी फळी माझ्या पाठीमागे गेल्या सर्वच निवडणुका उभे राहते, जवळपास मतदार संघातील हजार तरुण वर्ग यांच्याशी मी जोडले गेलेलो आहे व ते नेहमीच मला माझ्या सुखात दुःखात साथ देतात.
- सत्ताधारी भारतीय जनता पार्टीचे आमदार भीमराव तापकीर यांच्यावर नाराजीची सुप्त लाट आहे, मात्र पक्षाकडून उमेदवारी जर मिळाली तर निश्चित विजयाची तुतारी या मतदारसंघात माझ्या माध्यमातून वाजू शकते
- कुठलाही कार्यकर्ता किंवा कुठलाही नेता माझ्यावर नाराज नाही हीच माझी जमेची बाजू आहे. यामुळे विजयाची खात्री जास्त आहे.
- गेल्या दीड वर्षापासून विविध मार्गाने कॅम्प घेऊन मी शहरातील व ग्रामीण भागातील लोकांमध्ये जाण्याचा प्रयत्न करत आहे आणि त्या माध्यमातून मला मोठे यश देखील मिळाले आहे.
- विधानसभेची तयारी मी गेल्या दीड वर्षापासून करत आहे, मात्र अचानकपणे पक्ष फुटल्यानंतर मला खूप त्रास झाला, तरी देखील मात्र मी कुठल्याही यंत्रणेला न घाबरता एकनिष्ठ सुप्रियाताईंबरोबर राहिलो याचा निश्चित मला गर्व आहे.
- पक्षाने मला जर संधी दिली खडकवासला मतदारसंघात यावेळी मी तुतारी वाजवल्याशिवाय राहणार नाही असा शब्द देतो.